महाराष्ट्र शासन

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
मानखुर्द पोलीस ठाणे
लल्लुभाई कम्पाऊन्ड, मुंबई
दिनांक

**प्रेसनोट-**

## <u>*मानखुर्द पोलीसांनी चोरीचे मोबाईल फोन देशात व परदेशात विक्री करणाऱ्या टोळीचा केला पर्दाफाश*</u>

तक्रारदार, दि.११/०७/२०२२ रोजी रात्रौ १०:०० वा. सुमारास, मानखुर्द गोवंडी लिंक रोडवर मानखुर्द रेल्वे स्टेशनला जाणाऱ्या ॲटो रिक्षाची वाट पाहत फोनवर बोलत असताना, टि जंक्शन मानखुर्द मुंबई कडून विरूध्द दिशेने आलेल्या स्कुटी वरील ०२ इसमांनी आपआपसात संगनमत करून तक्रारदार यांचा सॅमसंग ए ८० कंपनीचा मोबाईल फोन जबरीने खेचून नेला म्हणून दिनांक २०/०७/२०२२ रोजी मानखुर्द पोलीस ठाणे, मुंबई येथे भादवि कलम ३९२, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे तपासात, गुप्त बातमीदारांकरवी प्राप्त माहितीचे आधारे एका २५ वर्षीय तरुणास शिवाजीनगर, मुंबई येथून दिनांक २१/०७/२०२२ रोजी अटक करण्यात आली होती. अटक आरोपीताकडे केलेल्या सखोल चौकशीत त्याने जबरीने चोरी केलेला मोबाईल हॅण्डसेट शिवाजीनगर स्थित एका २९ वर्षीय तरुणास विकल्याचे सांगितले. सदर माहितीचे आधारे गुन्हयातील जबरीने चोरीचा मोबाईल विकत घेणारे इसमाकडुन गुन्हयातील फिर्यादी यांचा सॅमसंग ए ८० कंपनीचा मोबाईल सह विविध कंपनीचे एकुण ३१ मोबाईल फोन त्यात (ॲपल कंपनीचे २१ व अन्य कंपनीचे ) असे अं.कि.रू १०,८५,०००/- चे मोबाईल फोन हस्तगत करण्यात आले. सदर इसमाकडे केलेल्या सखोल चौकशीत व तांत्रिक तपासात सदरचा इसम हा चोरीचे मोबाईल विकत घेणारा सराईत गुन्हेगार असल्याचे व तो चोरी करण्यात आलेले मोबाईल नेपाळ, उत्तरप्रदेश व कलकत्ता शहरात पाठवित असल्याचे निदर्शनास आले. तसेच त्याने अनेक गुन्हयातील चोरीचे मोबाईल विकत घेतले असुन आतापर्यंत मोठया प्रमाणावर चोरीचे मोबाईल फोन परदेशासह, परराज्यात पाठविल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामध्ये मोठया प्रमाणात अर्थिक व्यवहार झाल्याचे देखील निदर्शनास आले आहे.

तसेच, सदर इसमास, चोरीचे मोबाईल पुरविणाऱ्या अन्य ०५ आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. त्यातील एक २९ वर्षीय तरुण राठि- लल्लुभाई कम्पाऊन्ड, मानखुर्द याचेकडुन २५ व मोबाईल डिसमेन्टल करुन त्यातील पार्ट काढलेले १८ असे एकुण ४३ मोबाईल फोन, एक २६ वर्षीय तरुण राठि- लल्लुभाई कम्पाऊन्ड, मानखुर्द याचेकडुन ३ ॲप्पल कंपनीचे आय फोन व एक २२ वर्षीय तरुण राठि - नित्यानंद नगर, घाटकोपर याचेकडुन १ असे एकुण ४६ मोबाईल फोन (ॲपल कंपनीचे ४ व इतर अन्य कंपनीचे ) अंदाजे किंमत रुपये ७,००,०००/- ची मालमत्ता हस्तगत करण्यात आलेली आहे.

सदर कामगिरीत मानखुर्द पोलीस ठाणेने अंदाजे किंमत रुपये १७,८५,०००/- चे एकुण ७८ मोबाईल फोन (त्यामध्ये २५ ॲप्पल कंपनीचे आय फोन मोबाईल) हस्तगत करुन एकुण ०७ आरोपीतांना आजपावेतो अटक केली आहे. सदरचे सर्व आरोपीत दिनांक २७/०७/२०२२ रोजी पर्यत पोलीस कोठडीत आहेत. सदर गुन्हयात जप्त करण्यात आलेल्या मोबाईलचे आयएमईआय क्रमांकावरुन व वर्णनावरुन तो कोणत्या ठिकाणाहुन कोणाकडुन चोरी केला आहे याबाबत अधिक तपास मानखुर्द पोलीस करीत आहेत.

सदरची कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, चेंबूर, मुंबई श्री संजय दराडे, मा. पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-६, चेंबूर, मुंबई चे श्री कृष्णकांत उपाध्याय व मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, ट्रॉम्बे विभाग, श्री.नितीन जाधव यांचे मार्गदर्शनाखाली मानखुर्द पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महादेव कोळी, पोलीस निरीक्षक (जनसंपर्क) राजू सुर्वे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) आदिनाथ गावडे, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि गणेश वाघ, दिपक दळवी तसेच सपोनि किरण आंबेकर, दत्ता भोसले,पाटील, पोउपनि साळवी, मोरे,शेळके, सुर्वे व गुन्हे प्रकटीकरण पथकातील पो.ह.मिर व पथक यांनी कसोशीने तपास करुन नमुद गुन्हा उघडकीस आणला आहे.

*****************